
**KIRAN TUTORIALS** **Seat No.**


**Std 10 (English)** **Marathi** **Date 01-10-20**


| **Time 1HRS** | **Chapter 13,21,22,23,4.00,8.00** | **Marks 25** |
|---|---|---|


**Q.1** **पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **7**

**1** **A1)** आकृती पूर्ण करा 2

1) 


**Ans** 


2) 


**Ans** 


दोरीवरच्या उड्यांचा फक्त एकदा प्रयत्न केला व पहिली उडीच शेवटची ठरली, कारण आठ गुणिले दहाच्या आमच्या दिवाणखान्यात प्रथम दोरी संपूर्ण फिरवणे अवघड. एकदा डोक्यावरून दोरी पलीकडे गेली ती ड्रेसिंग टेबलावरच्या तेलांच्या व औषधांच्या बाटल्या खाली घेऊन आली. दुसऱ्यांदा अर्धवट गॅलरी आणि अर्धवट घरात राहून दोरी फिरवली ती आचार्य बर्व्यांच्या गळ्यात. त्यांचा माझ्यावर आधीच राग होता. मी उपास करतो हे कळल्यावर चाळीतली सारी मंडळी समाचाराला येऊन गेली; परंतु आचार्य बाबा बर्वे शेजारच्या खोलीत असूनही आले नाहीत, कारण 'उपास' हे त्यांचे खास राखीव कुरण होते.

"हा दुष्टपणा माझ्या गळ्यात दोरी अडकवून केलात हे ठीक झालं; पण तुमच्या वयाला न शोभणाऱ्या ह्या धिंगामस्तीला दुसरा कोणी माझ्या सारखं बळी पडला असता, तर तुमची धडगत नव्हती. मी तुम्हांला क्षमा करतो."

"पण... मी हे मुद्दाम केलं नाही, आचार्य! अहो वजन कमी करायला दोरीच्या उड्या मारतोय मी."

"काही उपयोग होणार नाही!"

"का?"

"का म्हणजे? जिभेवर ताबा नाही तुमचा. संयम हवा. मनाची एकाग्रता हवी. त्या साठी प्रथम काही गोष्टी सोडाव्या लागतील."

"आता ह्या उड्या मारायला मी लाजदेखील सोडली हे पाहता ना तुम्ही , बाबा?"

"ठीक आहे. प्रथम बोलणं सोडा."

"बोलणं सोडू?"

"अजिबात! खाण्यासाठी तोंडाचा वापर कमी करायचा एवढं पाहिलं तुम्ही ; पण बोलण्यासाठीदेखील त्याचा वापर बंद केल्याशिवाय तुमची जीभ ताब्यात राहाणार नाही."

"पण मला बोललंच पाहिजे, बाबा." मी केविलवाण्या स्वरात ओरडलो.

"का पण? एवढा संयम नाही तुमच्यात? मौनाचं सामर्थ्य मोठं आहे. मौन ही शक्ती आहे. मौन ही..."

Processing math: 100%

**Ans**

**A2)** एका वाक्यात उत्तर लिहा 2

1) आचार्य बर्वे यांच्या मते कशावर ताबा असावा ?

**Ans** आचार्य बर्वे यांच्या मते जिभेवर ताबा असावा.

2) आचार्य बर्वे यांच्या मते मोठी शक्ती कोणती ?

**Ans** आचार्य बर्वे यांच्या मते मौन मोठी शक्ती आहे.


**A3)** स्वमत 3

संयमाचे आपल्या जीवनातील महत्त्व सांगा.


**Ans** संयम हा मानवी जीवनात महत्त्वाचा भाग आहे संयम म्हणजे मनावरील ताबा होय. कोणत्याही परिस्थितीत आपल्या मनावर आपले नियंत्रण असावे. संयम नसेल व घाई केली तर कामे बिघडण्याची शक्यता असेल. घाई केल्याने अपघात होतो. संयम हा वागण्यात व बोलण्यात दोन्ही असतो. या संयमामुळे आपले समाजातील वागणे व बोलणे याची इतरांवर छाप पडते. संयम असेल तर अनर्थ घडत नाही. संयम हा परिस्थिती सांभाळून घेतो. संयम सुटला तर बोलणे व वागणे हे बिघडते.

**Q.2 पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा : 4**

1 **A1)** उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. 2




**Ans**




> कोकणात पावलापावलाला फणस नि उंबर. जिथे फणस तिथे गरूड असतातच. आमच्या भागात पाट भरपूर, बावीही भरपूर. पाणथळीही ओघानेच आल्या. पाणी तिथे बेडूक आणि बेडूक तिथे सर्प. फणसांवरच्या गरुडांची सक्त नजर पुन्हा बेडकांच्या नि शेतउंदरांच्या मागावरल्या सापांवर ! जरा कुठे पालापाचोळ्यात जिवाणू सळसळताना दिसलं की गरूडाने त्याला कुकरीसारख्या चोचीने चिरलंच म्हणून समजा. कोतवाल, सुतार, तांबट, सातभाई, दयाळ नि कवडे हे पक्षी तर कोकणात आमचे शाळूसोबतीच होते. कोतवालांच्या वहिवाटीच्या जागा बांबूच्या वनात, सुतार जांभळींवर, तांबट पळसांवर, आंब्यांवर साळुंक्या तामणीवर सुगरणी, भाजी मळ्यात सातभाई नि शेतात बगळे. खाडीतल्या चिखलात पाणकोंबड्या, झुडपात दयाळ नि खंड्या, वडांवर वटवाघळं. सरसकट सर्वत्र घारी आणि बंदरात गिधाडं !

**Ans**

**A2)** i) सहसंबंध लिहा. 1

फणस : गरूड :: पाणी : ..............

**Ans** फणस : गरूड :: पाणी : **बेडूक**

ii) चौकटी पूर्ण करा 1

पक्ष्याच्या वहिवाटीच्या जागा -

i. सातभाई -

ii. पाणकोंबड्या -

**Ans** i. सातभाई - **भाजीमळ्यात**

ii. पाणकोंबड्या - **खाडीतल्या चिखलात**

**Q.3 पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा. 8**

1 **A1)** घटनेनुसार वाक्यांचा क्रम लावा 2

Processing math: 100%

i. आयुष्य खुडलेल्या फुलासारखं टवटवीत होते.

ii. झाडाला पालवी फुटल्यावर शरीरभर पालवी फुटते.

iii. शरीरभर हिरवा रंगामुळे रक्त हिरवेगार होते.
iv. मुळावर घाव घातला तरी झाड शांतपणे सहन करते.

**Ans**
i. मुळावर घाव घातला तरी झाड शांतपणे सहन करते.
ii. शरीरभर हिरवा रंगामुळे रक्त हिरवेगार होते.
iii. आयुष्य खुडलेल्या फुलासारखं टवटवीत होते.
iv. झाडाला पालवी फुटल्यावर शरीरभर पालवी फुटते.

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**Ans**

**A2)** i) प्रश्न तयार करा 1

i. 'पानझडीनंतर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.
ii. 'मरगळ' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**Ans**
i. झाड केव्हा नवीन वस्त्र धारण करते ?
ii. शरीरभर पालवी फुटल्यावर कोण निघून जाते?

ii) एका वाक्यात उत्तर लिहा 1

झाडाच्या जीवनाचं गाणं कशात दडलेलं असते ?

**Ans** पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाच्या जीवनाचं संथ गाणे दडलेले असते.

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. टपोरे -
ii. खुडणे -
iii. टवटवीत -
iv. बाहु -

Processing math: 100%

**Ans** i. टपोरे - **गोल**

ii. खुडणे - **तोडणे**
iii. टवटवीत - **ताजेतवाने**
iv. बाहू - **हात**

**A4)** काव्यसौंदर्य 2

' झाडापासून आनंदी जगणे शिकावे।' या विधानातील अर्थ तुमच्या शब्दात व्यक्त करा.

**Ans** झाड कोणत्याही प्रकारचा भेदभाव करत नाही कधी पक्ष्यांचे घरटे बनून, वहीची पाने बनून सगळ्यांना मदत करीत असते. हिरव्या रंगामुळे उत्साहाची भावना जागृत करत असतो. फुलांनी, फळांनी बहरून सगळ्यांचे पोट भरत असता. झाडापासून माणसाने आनंदी जीवन शिकावे व आयुष्य सफल करावे.

**Q.4** **विरामचिन्ह** 1

1 विरामचिन्हांची नावे लिहा.

| | **विरामचिन्हे** | **नावे** |
|---|---|---|
| i. | ' ' | .............. |
| ii. | ! | .............. |

**Ans**

| | **विरामचिन्हे** | **नावे** |
|---|---|---|
| i. | ' ' | **एकेरी अवतरणचिन्ह** |
| ii. | ! | **उद्गारवाचक चिन्ह** |

**Q.5** **पत्रलेखन (Any One)** 5

1 खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

Processing math: 100%

**आरोग्यम् धनसंपदा**

'आधार नाशिक' संस्थेद्वारे शिबिराचे आयोजन

आरोग्य शिबिर

विविध शाळांमध्ये जाऊन

विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा विनामुल्य उपक्रम

**विशेष:** 1) चष्मे व काही औषधे विनामूल्य.

2) तज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध

3) प्राथमिक तपासणी व सल्ला

↓

आनंद / अनिता सावंत, विकास हायस्कूल, पुणे.

↓

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

| | | |
|---|---|---|
| शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने तुमच्या शाळेत दि. ५ ते १० नोव्हेंबर या कालावधित शिबिर घेण्याची विंनती पत्र | **किंवा** | शाळेचा प्रमुख या नात्याने उत्तम उपक्रम राबविण्याबाबद संस्था प्रमुखांचे अभिनंदन पत्र लिहा. |

**Ans** .

**2** खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

**त्वरा करा ! त्वरा करा !**

**सुवर्ण संधी**

कल्पना गणेश स्टोर्स दादर (पू.)

यांच्या तर्फे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी

स्वस्त दरात वेगवेगळ्या शाळेचे गणवेश शाळेच्या बॅगा

शालेय उपयुक्त वस्तू

↓

अनिल / अनिता जोशी मधुकुंज सोसायटी दादर (पूर्व)

↓

नागरिक या नात्याने

| | | |
|---|---|---|
| शालेय गणवेश उपयुक्त वस्तू मागविण्यासाठी पत्र लिहा. | **किंवा** | मागवलेल्या गणवेश व वस्तूत त्रुटी आढळल्याने बदलून देण्यासाठी विनंती पत्र लिहा. |

Processing math: 100%

**Ans** .

Processing math: 100%